# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. ०६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०३/०१/२०१८

**१) घराचे भिंतीचे खिळ्याला टांगुन बॅगमधुन पैश्याची चोरी :–**

दिनांक ०१/०१/२०१८ चे ०८.०० ते १५.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी सौ. रेणुका किशोर नागदेवे वय ४९ वर्ष. रा. भगतसिंग वार्ड नविन टाकळी भंडारा यांनी घराचे भिंतीचे खिळ्याला टांगुन असलेल्या बॅग मध्ये ठेवलेले १९,०००/–रु. कोणीतरी अज्ञात चोराने खुल्या दारातुन आत प्रवेश करुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिऱ्हेपुंजे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) क्षुल्लक कारणावरुन भांडण व शिवीगाळ करुन दगडाने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०२/०१/२०१८ चे ०६.४५ वाजता. दरम्यान यातील फिर्यादी घनश्याम सिताराम कामटे वय ३५ वर्ष, रा. भाईतलाव वार्ड वार्ड पवनी हा घरातील जुन्या संडासमधुन बाहेर निघाला असता आरोपीने फिर्यादीस तु आमच्या संडासात का गेलास? असे बोलुन शिवीगाळ करुन काठीने व दगडाने डोक्यावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,५०४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. कळपते पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**३) शासकीय परवाण्याचे उल्लघंन करुन जिवनावश्यक वस्तु वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०२/०१/२०१८ चे ०८.०० वाजता. दरम्यान यातील आरोपी क्र. १ ने शासकीय परवाण्याचे उल्लघंन करुन स्वस्त धाण्य दुकानाचा तांदुळ १७.२० क्विंटल किंमती ५१७८/–रु. चा वाहन क्र. एमएच १५ सीके ४४३१ च्या चालकाने दुसऱ्याच ठिकाणी विक्री करीता व विल्हेवाट लावण्या करीता वाहतुक करतांनी मिळुन आल्याने फिर्यादी मनोज गणपत डहारे वय ३२ वर्ष, तहसिल कार्यालय लाखांदुर याने सदर वाहन जप्त करुन पो.स्टे ला लेखी रिपोर्ट दिल्याने पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३(घ),७ जिवनावश्यक वस्तु कायदा १९५५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. बोरखडे पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**४) तरुणीचा बदनामी करुन लग्न न करण्यासाठी धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०२/०१/२०१८ चे १८.०० वाजता. दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीचे ज्याच्या सोबत लग्न जुळले त्यास फिर्यादीने माझ्या सोबत प्रेम संबध आहेत तसेच तिचे माझे अनैतीक संबध आहेत व ती गरोदर आहे असे त्यांना सांगुन लग्न न करणे याबाबत धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ५०६,५०९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. पटोले पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**५) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :–**

दिनांक ३१/१२/२०१७ चे १२.३० वाजता दरम्यान यातील मृतक कैलास मधुकर नेवारे वय ४५ वर्ष, रा. खरबी हा आपले घरी झोपला असता त्याचे पत्नीने उठविले असता मृतक हा उठत नसल्याने त्यास बेशुध्द अवस्थेत सा. रु. भंडारा येथे औषधोपचाराकामी भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो.स्टे भंडारा मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे प्राप्त कागदपत्रावरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सोडगिर पो.स्टे जवाहरनगर हे करीत आहेत.

**६) विषारी औषध प्राशन करुन औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु. :–**

दिनांक ०२/०१/२०१८ चे ०३.३० वाजता दरम्यान यातील मृतक प्रशांत श्रीहरी टिचकुले वय ५० वर्ष, रा. गडेगाव याने उंदीर मारण्याची औषध प्राशन करुन त्याची प्रकृती बिघडल्याने त्यास औषधोपचारा करीता सा. रु. भंडारा येथे वार्ड क्र. ०९ मध्ये दिनांक ३१/१२/२०१७ ला भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ क. १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पो. शि. हेडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

**७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०१/१२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ५२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी – ०१ तीन सिटर वाहनांवरती– ११ केसेस व ईतर वाहनांवरती –४० केसेस करण्यात आले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.